# अनेरडॅम वन्यजीव अभयारण्य



चक्रवाक

धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यात मुंबई–आग्रा राष्ट्रीय महामार्गावर असलेले हे महाराष्ट्राच्या वायव्य भागातील एक प्रसिद्ध अभयारण्य आहे. हा सातपुडा पर्वत रांगांचा नैऋत्येकडील भाग आहे. याला लागूनच मध्यप्रदेशमधील यावल वन्यजीव अभयारण्य आहे. याठिकाणी वाहणाऱ्या अनेर नदीवर धरण बांधण्यात आले आहे. १० ऑक्टोबर १९८६ रोजी अनेर धरणाचा परिसर अनेर डॅम वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आला. या प्रदेशाचे क्षेत्र ८२.९४ चौरस किलोमीटर आहे. नयनरम्य असा हा सातपुड्याचा परिसर आहे. तसेच वन्यप्राण्यांनी समृद्ध आहे. त्यामुळे पर्यटक आपसूकच इकडे आकर्षित होतात. तडवी, परमार, कोकणा या जमाती या ठिकाणी राहतात.



खैर



उघड्या चोचीचा करकोचा



बेल



घोरपड



ब्लू टायगर

## जैवविविधता :

अनेरडॅम वन्यजीव अभयारण्य काही ठिकाणी झुडपी तर काही ठिकाणी दाट जंगल अशा मिश्र वनप्रकारातून बनले आहे. औषधी वनस्पती येथे मोठ्या प्रमाणात आहेत. खैर, हिवर, बाभूळ, बेल, धावडा, पळस, सलई या येथील काही सर्वसामान्य वृक्ष प्रजाती आहेत. निर्गुंडी, मुरूडशेंग, तरवड यांसारखी झुडूपवर्गीय वनस्पती आहेत. सामान्यपणे येथे कुसळ, रोसा, कुडा, शेडा हे गवत आढळून येते. अनेर धरणाच्या पाणलोट क्षेत्रामुळे येथे जंगलवासी पक्ष्यांबरोबरच पाणथळ पक्ष्यांची संख्यादेखील विपूल आहे. विविध प्रकारचे करकोचे, बदक, शराटी आढळून येतात. सस्तन प्राण्यांमध्ये भेकर, चिंकारा, ससा, साळिंदर, रानमांजर आढळून येतात. काही वेळा तरस, कोल्हा, लांडगा यांचे दर्शन होते.



भेकर



चिंकारा



**कसे पोहचाल :**
**जवळचे विमानतळ :** औरंगाबाद – २१५ किमी.
**जवळचे रेल्वेस्टेशन :** मुंबई–भुसावळ मार्गावर चाळीसगाव – १२५ किमी. आणि नरदोना – ४० किमी.
**रस्त्याने :** शिरपूर – ३८ किमी., धुळे – ८६ किमी.

**भेटसाठी सर्वोत्तम हंगाम :** नोव्हेंबर ते फेब्रुवारी, उन्हाळ्यात प्राण्यांचे दर्शन होते.